10

# महात्मा फुले कृषि विदयापीठ,
## राहुरी, जि. अहमदनगर.

---

जा.क्र.मफुकृवि/लेखा-४/नपअंनिवेयो/परतावा/२०१७/१७५/    दिनांक:-१९/०७/२०१७

**परिपत्रक**

संदर्भ:- १)शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण-१५१४/प्र.क्र.११७/६-अे, दिनांक: ३०.११.२०१५.

शासन निर्णय क्र.अंनियो१००५/१२६/सेवा-४, दि.३१.ऑक्टोबर २००५ अन्वये कृषि विद्यापीठ सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू झालेली आहे. तथापी ज्या

१. कर्मचा-यांचा सेवेत असताना मृत्यू झाला .
२. कर्मचा-याने नियत वयोमानापूर्वी (यथास्थिती, ५८/६० वर्षे) सेवात्याग केल्यास.
३. दिनांक ०१नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर राज्यातील दुस-या सेवेत रुजू झाल्यास.

ज्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन) नियम,१९८२ च्या तरतूदी लागू ठरल्या आहेत व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखाली वर्गणी कपात करण्यात आली आहे. अश्या कर्मचा-यांना सदर योजनेत जमा असलेली रक्कम परत करणेसाठी संदर्भीय शासन निर्णयामध्ये जोडपत्राव्दारे नमुना अ,ब,क,ड, इ व नमुना-R-३ चा समावेश करण्यात आलेला आहे.

तरी या परिपत्रकाव्दारे सर्व योजना प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविणेत येते की, वर दर्शविणेत आलेल्या कारणामुळे एखादया कर्मचा-यास परिभाषित अंशदान निवृत्तीवेतना मधील जमा रक्कम परत करावयाची झाल्यास शासन निर्णयामध्ये दर्शविणेत आलेले जोडपत्रे भरुन परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावा म्हणजे सदर रक्कमा एकत्रीत करुन शासनाकडुन अनुदान प्राप्त करता येईल.

सहाय्यक नियंत्रक(४),
महात्मा फुले कृषि विदयापीठ,
राहुरी.

**प्रतः माहितीसाठी सादर :-**

१. संचालक, विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
२. अधिष्ठाता (कृषि), मफुकृवि, राहुरी.
३. संशोधन संचालक, मफुकृवि, राहुरी.
४. सहयोगी अधिष्ठाता (पम), मफुकृवि, राहुरी.
५. सहयोगी अधिष्ठाता,डॉ. आ. शिं. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी.
६. सहयोगी अधिष्ठाता,पुणे/धुळे/कोल्हापूर.
७. कुलसचिव/विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी.
८. सहयोगी संशोधन संचालक,पुणे/इगतपुरी/कोल्हापूर/सोलापूर.
९. प्रकल्प अधिकारी,शासकीय कृषि महाविद्यालय,नंदुरबार/कराड.
१०. प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालये,सर्व.
११. सर्व संशोधन केद्राचे प्रभारी अधिकारी/योजना प्रमुख./विभाग प्रमुख.
१२. अधिदान व लेखाधिकारी,पुणे/धुळे/कोल्हापूर/राहुरी,अतिरिक्त लेखा व अधिदान अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
१३. मा.कुलगुरु,मफुकृवि,राहुरी यांचे स्वीय सहाय्यक.
१४. उपकुलसचिव, (प्रशासन/विद्या), मफुकृवि, राहुरी.
१५. सहाय्यक कुलसचिव, (काव्य), मफुकृवि, राहुरी.